CBSE Affiliated

Shree Sai Education Society's

# The Vatsalya School

S.No. 16, Mauje Wadachiwadi, Undri, Tehsil Haveli, Pune 411060

SCHOOL CODE :- 30241 U-DISE NO :- 27250508402

## हमीपत्र

मा. मोहदय,

मी सौ.विनिता राजीव अरोरा मुख्याध्यापिका म्हणून द वात्सल्य स्कूल(U-DISE NO:-27250508402) मौजे वडाचीवाडी उंड्री पुणे येथे कार्यरत असून, आपणास हमी देते कि आमच्या शाळेकडे मा.शिक्षणउपसंचालक यांचे मान्यतेचे पत्र नाही. परंतु शासनाच्या शाळा मान्यतेचा पत्रात शासनाकडील संधर्भाधीन पत्रान्वये असा उल्लेख व संदर्भ नमूद केला आहे. तरी प्रस्तावा सोबत सदर अपलोड केलेले कागदपत्रे सत्य असून सर्व परवानगी व कागदपत्रे विहित मार्गाने मिळवलेली आहेत याची मी हमी देते.

या संदर्भात भविष्यात चुकीची अथवा खोटी कागदपत्रे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी मुख्याधापक म्हणून माझी राहील याची मला जाणीव आहे.

कळावे,

आपली विश्वासू.

(मुख्याध्यापिका सौ. विनिता राजीव अरोरा )

PRINCIPAL
The Vatsalya School
Pune-60

THE VATSALYA SCHOOL PUNE

कायम विना अनुदानित

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/७५१/२०१४**
**पुणे १ दिनांकः- २४/०३/२०१४**

प्रति,

**अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,**
**श्री. साई एज्युकेशन सोसायटी संचलित,**
**द वात्सल्य स्कूल, स.नं.१६, वडाची वाडी,**
**उंड्री, ता.हवेली, जि.पुणे.**

विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपला दिनांक १८/०५/२०१३ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी शिक्षणाधिकारी **(प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक **०१ एप्रिल २०१३** पासून दिनांक **३१ मार्च २०१६** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता **१ ली ते इ. ७ वी** करिता **श्री. साई एज्युकेशन सोसायटी संचलित, द वात्सल्य स्कूल, स.नं.१६, वडाची वाडी, उंड्री, ता.हवेली, जि.पुणे.** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे. :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.

३. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात, किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)** विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमानेन शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्येविनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपल्बध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ. :- **५ एकर**
- एकूण बांधकामाचे क्षेत्र. :- **२०००० चौ.फुट**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ. **३६००० चौ.मी**
- वर्ग खोल्यांची संख्या. :- **१५**
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. :- **०३**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? :-

| | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| संडास | ०५ | ०४ | ०९ |
| मुताऱ्या | ०६ | ०८ | १४ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा. :- **आहे.**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर. :- **कायम विना अनुदानित शाळा असल्याने शा.पो.आहार योजना लागु नाही.**
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता. :- **आहे.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.:- **आहे. (पुस्तकसंख्या-१८००, वर्तमान पत्रे / नियतकालिके ०२)**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विवस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक **प्राथ./का.वि.अ./इं./सी.बी.एस.ई./एच.व्ही.एल/७१७/२०१३-१४** असा आहे. तसेच आपल्या शाळेचा **U-DISE No. 27250508402** हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

१७. मा. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

.0GOVERNMENT OF MAHARASHTRA

No. NOC 2008/(3/08)/SE-1
School Education and Sports Department
Mantralaya annexe, Mumbai 400 032
Dated 24 / 4/ 2008

To,
The Secretary,
Central Board of Secondary Education,
Community Centre, Preet Vihar,
New Delhi.-110092.

Subject : Issue of No Objection Certificate for C.B.S.E. affiliation to The Vatsalya School , at Vanvadi, Salunkhe Vihar Road, Dist. Pune

Sir,

The Government of Maharashtra has no objection to The Vatsalya School , at Salunkhe Vihar Road, Dist. Pune run by Shree Sai Education Society, Clover Heights, Salunkhe Vihar Road, Dist. Pune to be affiliated to the Central Board of Secondary Education, New Delhi.

This no objection is subject to the trust submitting the following information to the Education Officer (Secondary), Pune each year in the month of June.

**Table 1 :**

Name of the school :

| Address : Class (I to XII) | Total number of students in each class | Boys | Girls | Average age | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Boys | Girls |
| | | | | | |

1) School result X = %

Highest % achieved =

Lowest % achieved =

2) School result XII = %

Highest % achieved =

Lowest % achieved =

Please forward us a copy of the affiliation when granted to this school for our record.

Yours faithfully,

SSKharat

( Suvarna S. Kharat )
Under Secretary to Government

Copy to :
1) Director of Education (Secondary and Higher Secondary ) Maharashtra State, Pune
2) The Deputy Director of Education, Mumbai
3) Education Officer (Secondary) Zilla Parishad, Thane
4) Secretary, Shree Sai Education Society, Clover Heights, Salunkhe Vihar Road, Dist. Pune
5) S.F. SE-1

E/shaley865/se1/noc 937